**नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०२४**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००३५५-२०२४**

**निशाणी क्र.३४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ तर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.२ हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना प्रवास करणे शक्य होत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना कागदपत्रांची जमवाजमव करुन कैफियत देण्यासाठी आवश्यक तयारी करता आली नव्हती. प्रतिवादी क्र.२ यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. तरी प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येवुन व कैफियत देण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन विरोध दर्शवला आहे. त्यांच्या कथना नुसार प्रतिवादी क्र.२ यांना दाव्याची समन्स बजावणी होऊन बरेच महिने झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ यांनी दावा विलंबाने चालविण्याकरिता कैफियत दिली नाही. सदर कारणांमुळे प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्यात यावा व कैफियत देणेस परवानगी देवू नये अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ हे प्रस्तुत प्रकरणी हजर झाले आहेत. परंतु कैफियत दाखल करणेस

असणारा विहित कालावधी उलटून देखील प्रतिवादी क्र.२ यांनी अदयाप पावेतो आपली कैफियत अभिलेखावर दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना आपली कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. जरी वादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवला असला तरी केवळ तांत्रिक कारणास्तव प्रतिवादी क्र.२ यांची कैफियत नाकारणे योग्य नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रस्तुत प्रकरणी कैफियत दाखल करण्याची इच्छा दर्शवली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी आपल्या अर्जासोबत कैफियतीची प्रत देखील अभिलेखावर दाखल केली आहे. यावरुन प्रतिवादी क्र.२ यांना प्रस्तुत प्रकरणी हजर होऊन आपली कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची प्रामाणिक इच्छा असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन प्रतिवादी क्र.२ यांची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून उलट दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणार आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२ यांच्या निष्काळजीपणामुळे दाव्याच्या सुनावणीस झालेला विलंब देखील नजरेआड करता येणार नाही. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.३४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी वादी यांना रक्कम रु.२००/– खर्चापोटी देण्याच्या अटीवर कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येईल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.11.19 16:32:09 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः १९/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड